


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक **जनसंचलन**

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com

Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : २०७ वा शनिवार दि ०४ ऑक्टोंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# येत्या सोमवारी मंत्रालयातून मोठी घोषणा होणार स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीआधी...

**वृत्तसंस्था/मुंबई**

गृहमंत्री आणि भाजपचे वरिष्ठ नेते अमित शहांनी २०२९ मध्ये भाजप स्वबळावर लढेल अशी घोषणा गेल्याच वर्षी केली. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान शहा मुंबईत आले होते. त्यावेळी त्यांनी २०२९ साठीचे पक्षाचे इरादे स्पष्ट केले. तेव्हापासून भाजपच्या मित्रपक्षांमध्ये अस्वस्थता आहे. विरोधी पक्षांमधील अनेक महत्त्वाचे नेते, भविष्यात चांगली टक्कर देण्याची क्षमता असलेले चेहरे भाजपनं आपल्याकडे खेचण्यास सुरुवात केली. काही ठिकाणी भाजपनं आपल्या नेत्यांना मित्रपक्षांच्या आमदारांविरोधात ताकद देण्यास सुरुवात केली आहे. लोकसभा निवडणुकीत मुंबईत भाजपला मोठा धक्का बसला. भाजपला ३ पैकी केवळ १ जागा निवडून आणता आली नाही. पण विधानसभेला भाजपनं १५ जागा जिंकत मुसंडी मारली. आता भाजपनं महापालिकेसाठी तयारी सुरु केली. शिंदेसेनेनंदेखील पालिकेसाठी फिल्डींग लावली आहे. सहा लोकसभा मतदारसंघांची जबाबदारी सात नेत्यांकडे देण्यात आली आहे. यातील एका नेत्याची भाजपनं कोंडी करण्यास सुरुवात केली आहे. उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे प्रमुख नेते एकनाथ शिंदे यांनी गेल्याच महिन्यात लोकसभा मतदारसंघांनुसार जबाबदाऱ्यांचं वाटप केलं. उत्तर मुंबईची जबाबदारी मागाठाण्याचे आमदार प्रकाश सुर्वेंकडे सोपवण्यात आली. ते तीन टर्मचे आमदार आहेत. २०१४ पासून त्यांनी सलग तीन निवडणुका जिंकल्या आहेत. आता त्यांच्या विरोधात भाजपनं विधान परिषदेचे गटनेते प्रवीण दरेकर यांना ताकद दिली आहे. महाराष्ट्र स्वयंपुनर्विकास प्राधिकरणाच्या स्थापनेनंतर त्याच्या अध्यक्षपदाची जबाबदारी प्रवीण दरेकर यांच्याकडे देण्यात आली. या पदाला कॅबिनेट मंत्रिपदाचा दर्जा देण्यात आलेला आहे. यानंतर दरेकर समर्थकांनी मागाठाण्यात बॅनर लावले आहेत. दरेकर यांची सर्वाधिक ताकद मागाठाण्यात आहेत. २००९ मध्ये ते याच मतदारसंघातून मनसेच्या तिकिटावर निवडून येत आमदार झाले होते. तेव्हा त्यांनी प्रकाश सुर्वे यांचा पराभव केला होता. २०१४ मध्ये राज्यात सत्ताविरोधी लाट होती. वातावरण विरोधी पक्षांच्या बाजूनं होतं. त्याचा अंदाज घेत प्रकाश सुर्वे यांनी शिवसेनेत प्रवेश केला. तर दरेकर पुन्हा मनसेच्या तिकिटावर लढले. त्यांचा धुव्वा उडाला. सुर्वे यांनी त्यांना पाणी पाजत आमदारकी मिळवली. पराभवानंतर ते राजकारणात बॅकफूटवर गेले. पण काळाची पावलं ओळखत त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आणि तिथल्या ज्येष्ठांना, अनुभवी नेत्यांना, निष्ठावंतांना मागे टाकत विधान परिषदेची आमदारकी मिळवली. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना ते विरोधी पक्षनेतेही झाले. मागाठाणे मतदारसंघातील प्रभाग क्रमांक ५ मधून प्रवीण दरेकर यांचे बंधू प्रकाश दरेकर नगरसेवक राहिले आहेत. त्यामुळे प्रवीण दरेकर राज्याच्या राजकारणात सक्रिय असताना मतदारसंघाच्या आघाडीवर त्यांचे बंधू कार्यरत असतात. उत्तर मुंबईत विधानसभेच्या



६ जागा आहेत. त्यातील ४ जागांवर भाजपचे आमदार आहेत. तर प्रत्येकी एक जागा शिंदेसेना आणि काँग्रेसकडे आहे. काँग्रेसचा आमदार असलेला मालवणी मतदारसंघ मुस्लिमबहुल मानला जातो. तिथे दरेकर यांचं फारसं प्राबल्य नाही. त्यांची ताकद मागाठाण्यात आहे. एकीकडे एकनाथ शिंदे यांनी लोकसभेच्या ६ जागांसाठी ७ नेत्यांची निवड करत त्यांना पालिकेची जबाबदारी दिलेली आहे. यात प्रकाश सुर्वेंचा समावेश आहे. भाजपचा बालेकिल्ला असलेल्या उत्तर मुंबईत कमाल करुन दाखवण्याचं आव्हान सुर्वेंसमोर आहे. त्यातच आता सुर्वे यांचे एकेकाळचे प्रतिस्पर्धी असलेल्या दरेकर यांना भाजपनं ताकद दिली आहे. शॉर्ट टर्ममध्ये पालिका आणि लाँग टर्ममध्ये विधानसभा अशी तयारी भाजपनं सुरु केल्यानं मागाठाण्यातील शिंदेसेनेत अस्वस्थता आहे.

# आक्षेपांची दखल; बुलढाणा पालिकेच्या रचनेत बदल!

**जनसंचलन/बुलढाणा**

वर्ष २०१६ नंतर तब्बल ८ वर्षांनी होत असलेल्या बुलढाणा नगर परिषद निवडणुकीबाबतची हालचाल वेगवान झाली आहे. दरम्यान, नगर परिषद प्रशासनाने अंतिम प्रभाग रचनेचा आराखडा ३० सप्टेंबर रोजी सार्वजनिक केला आहे. या अंतिम रचनेनंतर आता सर्व राजकीय पक्ष नगराध्यक्ष पदाच्या आरक्षणाची आतुरतेने वाट पाहत आहेत. आक्षेपांची दखल घेत बुलढाण्यातील प्रभाग १३ मधील एक गणक प्रभाग ५ मध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. यासोबतच प्रभागातील लॅन्डमार्कही समाविष्ट करत चुकीच्या पद्धतीने रचनेची केलेली सुरूवात दुरुस्त करण्यात आली आहे. अशा पद्धतीची दुरुस्ती राज्याचा विचार करता केवळ बुलढाण्यातच करण्यात आल्याचा दावा ही भाजपकडून करण्यात आला आहे. १९ ऑगस्ट रोजी बुलढाणा नगरपरिषदेची प्रभाग रचना जाहीर करण्यात आली होती. त्यानंतर ३१ ऑगस्टपर्यंत या जाहीर प्रभाग रचनेवर आक्षेप व सूचना नोंदविण्यात आल्या. १ ते ८ सप्टेंबर दरम्यान या आक्षेपांची सुनावणी झाली व अखेर ३० सप्टेंबरला अंतिम प्रभाग रचना घोषित करण्यात आली. दीर्घकाळापासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची प्रतीक्षा सामान्य नागरिकांपासून राजकीय पक्षांपर्यंत १५ आक्षेप झाले होते दाखल १५ आक्षेपांवर सुनावणी बुलढाणा नगरपरिषदेच्या प्रारूप प्रभाग रचनेवर नागरिक व विविध पक्षांच्या प्रतिनिधींनी जवळपास १५ आक्षेप नोंदवले होते. या आक्षेपांवर जिल्हाधिकाऱ्यांच्या प्रमुख उपस्थितीत सुनावणी घेण्यात आली आणि त्यानंतर ३० सप्टेंबरला अंतिम प्रभाग रचना सार्वजनिक करण्यात आली. एका प्रभागासह, दोन सदस्यांची वाढ नगर परिषद बुलढाणा येथे यापूर्वी २८ सदस्य आणि ३ सहनियुक्त सदस्य असे मिळून एकूण ३१ नगरसेवक होते. मात्र शहराच्या वाढत्या लोकसंख्येला अनुसरून या वर्षी एका प्रभागाची वाढ करण्यात आली असून त्यानुसार दोन सदस्य वाढले आहेत. यानंतर आता नगर परिषदेत एकूण १५ प्रभाग असतील आणि ३० नगरसेवक निवडून येतील. नगर परिषदेच्या २०१६ मधील निवडणुकीचा कार्यकाळ ३ जानेवारी २०२१ ला संपला. त्यानंतर




नगर परिषदेवर प्रशासक राज सुरू आहे. प्रशासक राजामुळे स्थानिक नागरिकांच्या लहानमोठ्या समस्या जशाच्या तशा राहिल्या आहेत. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर राज्यभरातील स्थानिक स्वराज्य स्थांच्या निवडणुकांची प्रक्रिया सुरू झाली असून सध्या ती चरमसीमेवर आहे.

# सजावट की अंतर्गत विध्वंस?

## संपादकीय लेख

अन्न, वस्त्र आणि निवारा या माणसाच्या पारंपरिक मूलभूत गरजा आहेत. मात्र आजच्या शहरी वास्तव्यात निवारा केवळ छपरापुरता मर्यादित नाही; तो प्रतिष्ठेचे, सुरक्षिततेचे आणि सौंदर्यदृष्टीचेही प्रतीक झाला आहे. स्वतःचे मालकीचे घर विकत घेतल्याशिवाय बहुतेकांना चैन पडत नाही. प्रत्येक नोकरदार किंवा व्यावसायिक व्यक्ती आपल्या कुवतीनुसार घर विकत घेण्याचा आटोकाट प्रयत्न करतो. घराचा ताबा मिळाल्यानंतर लगेचच अंतर्गत सजावट करून गृहशांती केली जाते. त्यामुळे निवाऱ्यासोबतच घराची अंतर्गत सजावट ही एक मूलभूत गरज झाल्यासारखी परिस्थिती आहे. महानगरपालिकेकडून भोगवटा प्रमाणपत्र मिळाल्यानंतर बिल्डरकडून घराचा मालकी ताबा ग्राहकाला मिळतो. त्यानंतर लगेच घरमालक अंतर्गत सजावटकार नेमून घर सजवण्यास सुरुवात करतात. आज बांधकामात पारंपरिक कॉलम- बीम - स्लॅब पद्धत तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञानात प्रीकास्ट आणि मायवन अशा पद्धती वापरल्या जातात. फ्लॅट दोन हजार चौरस फुटांचा म्हणजेच चार बेडरूमचा जरी असला, तरी क्षेत्रफळ आणखी कुठे वाढवता येईल, याचा विचार अनेक घरमालक करताना दिसतात. परिणामी एकाच इमारतीत अनेक इंटिरीअर डिझायनर एकाच वेळी काम करत असतात. घराच्या आराखड्यात बीम, कॉलम, स्लॅब, सज्जा, डक्ट, पोटमाळा किंवा वॉर्डरोब यांसाठी आरसीसीमध्ये तरतुदी केलेल्या असतात. काही ठिकाणी फ्रेंच विंडोज असतात वास्तुविशारद आपले सर्व कौशल्य पणाला लावून इमारतीचे बाह्य सौंदर्य अत्यंत आकर्षक आणि देखणे बनवतो. त्यासाठी काही ठिकाणी डमी वॉल, आरसीसी फिन्स (परदी), परगोला, डक्ट तसेच ओपन डक्टसहित गोलाकार बाल्कनी यांसारखी रचना केली जाते. काही वेळा या परदीचा उपयोग आजूबाजूच्या फ्लॅट्सची प्रायव्हसी जपण्यासाठी केलेला असतो. मात्र, अंतर्गत सजावटकार वेगळाच असल्याने तो आपल्या सजावटीच्या कल्पकतेतून ओपन डक्ट बंद करण्याचा सल्ला देतो. अशा बदलांमुळे समोरच्या फ्लॅटमधील प्रायव्हसीला धक्का लागतो. म्हणूनच अंतर्गत सजावटकारांनी मुख्य वास्तुविशारदाची मूळ संकल्पना अबाधित ठेवूनच आपले काम करायला हवे. सजावटकार आपली उपयुक्तता सिद्ध करण्यासाठी विविध युक्त्या तसेच बदल सांगतात - जसे की, विंडो ग्रील बाहेर सरकवणे, डमी डक्ट तोडून स्टोरेज बनवणे, वेदर शेड किंवा सज्जा हॉल-बेडरूमला जोडणे, वास्तू शास्त्राप्रमाणे स्वच्छता गृहाची रचना बदलणे... अशा प्रस्तावांनी घरमालक आकर्षले जातात, पण कळत नकळत ते स्वतःच्या इमारतीची सुरक्षितता धोक्यात आणतात. अशा उपायांनी अनेकदा इमारतीचे बाह्य सौंदर्य देखील हरवते. एका घरमालकाने केलेले अंतर्गत बदल पाहून इतरही तसेच करतात आणि त्यामुळे सतत तोडफोड चालू राहते. त्यामुळे संपूर्ण इमारतीत पाणी गळती, काँक्रीट कार्बोनेशन, भेगा, तडे निर्माण होतात. खालच्या मजल्यांवरील लोकांचे रंगकाम, लाकडी काम खराब होते. सोसायटी कमिटी वारंवार नोटीस देते, पण त्या बहुतेक वेळा त्या कचऱ्यात जातात. २५ मजल्यांच्या इमारतींमध्ये साधारणपणे १५० ते २०० फ्लॅट्स असतात. त्यापैकी किमान ८० टक्के घरमालक अंतर्गत सजावट करतात. इतक्या मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बदल झाले तर वास्तुविशारदाने दिलेली मूळ रचना, सौंदर्य या गोष्टी अबाधित कशा राहतील? अनेक सजावटकार ही वाढवलेली जागा आत्ताच्या बाजारभावाने इतक्या लाखांची आहे, असे दाखवून ग्राहकांची समजूत काढतात आणि तो अनधिकृत बदल घडवून आणतात. पण या हव्यासापोटी इमारतीच्या आत-बाहेर किती गंभीर नुकसान होते, याची कल्पना बहुतेक घरमालकांना तसेच सजावटकाराला नसते. अंतर्गत सजावट करताना घरमालक बहुधा तोडकामातून निर्माण झालेला राडारोडा आपल्या पार्किंगमध्ये दिवसदिवस साठवून ठेवतात. त्यात ओले व सुके असे दोन्ही घटक असतात. हा सर्व कचरा एकत्रित साचल्यामुळे तेथे डास वाढण्याची शक्यता निर्माण होते, ज्यामुळे रहिवाशांना रोगराईचा धोका संभवतो. याशिवाय, पार्किंगमध्ये वाळू आणि बांधकाम साहित्य मोठ्या प्रमाणावर साठवले जाते. तोडफोड केलेला राडारोडा आणि नवे बांधकाम साहित्य इमारतीच्या चालू लिफ्टमधूनच आत-बाहेर केले जात असल्याने बहुतेक वेळा रहिवाशांना लिफ्टसमोर थांबावे लागते. अंतर्गत सजावट ही खरे तर वरवरची सुंदरतेची शस्त्रक्रिया आहे. पण ही शस्त्रक्रिया एकाच इमारतीत अनेक वेळा क्षेत्रवाढीच्या हव्यासापोटी करण्यात येते आणि संपूर्ण इमारत मृत्यूच्या दाढेत ढकलली जाते. नियमबाह्य अंतर्गत सजावट म्हणजे इमारतीवर झालेला अतिरेकी हल्ला ठरते, तो कायद्याच्या कठोर चौकटीत रोखणे अत्यावश्यक आहे. अंतर्गत सजावटीच्या अनधिकृत बदलांमुळे सोसायटी व्यवस्थापन समिती आणि फ्लॅटमालक यांच्यात सतत वादविवाद उभे राहतात. काही वेळा हे वाद केवळ कामापुरते मर्यादित न राहता वैयक्तिक पातळीवरही कटुता व द्वेष निर्माण करतात. लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे सोसायटी कमिटीचे सदस्य हे पगारी कर्मचारी नसतात; ते इतर कामांबरोबरच सोसायटीच्या हितासाठी जबाबदाऱ्या पार पाडतात. त्यामुळे प्रत्येक फ्लॅटमधील अंतर्गत सजावटीच्या कामांवर रोज लक्ष ठेवणे त्यांच्या दृष्टीने अशक्यच असते. अनधिकृत बदल कायमचे रोखायचे असतील, तर सुरुवातीपासूनच सर्व सभासदांमध्ये एकोपा, शिस्त आणि एकवाक्यता असणे अत्यावश्यक आहे. घर म्हणजे नुसत्या चार भिंती नसून, त्यात प्रेम, आपुलकी, विश्वास, जिव्हाळा, परस्परसंबंध, अर्थपूर्ण संवाद आणि सुरक्षितता यांचा समावेश असायला हवा. म्हणूनच फ्लॅटचे अंर्तगत सजावटीकरण सुरक्षित होण्याबरोबरच बाह्य सौंदर्य बिघडू नये यासाठी खालील १२ कलमी कार्यक्रम सोसायटी व्यवस्थापन समितीने पारदर्शक पद्धतीने राबविला पाहिजे.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# राज ठाकरे दसरा मेळाव्यात गैरहजर, सोबत येणार की नाहीत? उद्धव ठाकरेंची सर्वात मोठी घोषणा..

**मुंबई :** आगामी काळात मुंबई महापालिकेची निवडणूक आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. प्रत्येक पक्ष आपापली तयारी करत आहेत. शिवसेनेत मोठी फूट पडली आहे. त्यानंतर पहिल्यांदा मुंबई महापालिका निवडणूक पार पडणार आहे. या निवडणुकीत मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे एकत्र येण्याची शक्यता आहे. याबाबत अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. विशेष म्हणजे ठाकरे गटाच्या दसरा मेळाव्यात मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे देखील उपस्थिती लावतील अशी चर्चा होती. पण तसं काही घडलं नाही. त्यामुळे आगामी काळात दोन्ही भाऊ खरंच एकत्र येणार की नाहीत? याबाबत संभ्रम निर्माण झाला. पण उद्धव ठाकरे यांनी आपल्या आजच्या भाषणात याबाबत मोठं वक्तव्य केलं.



आता कोण बोललं की, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येणार का? अरे मग ५ जुलैला आम्ही काय केलं होतं? तेव्हा मी बोललेलो आहे, आम्ही एकत्र आलो आहोत ते एकत्र राहण्यासाठी', अशी भूमिका उद्धव ठाकरे यांनी मांडली. 'जिथे माझ्या मातृभाषेचा घात होत असेल तिथे मी मराठी माणसात फूट पडू देणार नाही. मराठीवर हिंदीची सक्ती हे मी आज जाहीरपणाने सांगतोय. आमचा हिंदीला विरोध नाही. पण आच्यावर हिंदीची सक्ती करायची नाही. भाषावर प्रांत रचना झाली. त्या प्रांत रचनेप्रमाणे प्रत्येक भाषेला एक प्रांत मिळाला', असं उद्धव ठाकरे म्हणाले.गुजराती लोकांना गुजरात मिळालं. बंगाली लोकांना बंगाल मिळालं. कानडी लोकांना कर्नाटक मिळालं. सगळेच राज्य, तसा मराठी माणसाला महाराष्ट्र मिळाला. प्रत्येक राज्याला राज्याचं सरकार, राज्याची राजधानी मिळालं. पण महाराष्ट्राला राजधानी मिळाली नव्हती. मराठी माणसाने रक्त सांडून ही मुंबई मिळवील. ही मुंबई व्यापाऱ्यांच्या खिशात जात असेल तर खिसा फाडून आम्ही मुंबई राखल्याशिवाय राहणार नाहीत.

त्यामुळे या ज्या कंड्या पिकवल्या जात आहेत, दसरा मेळाव्यात राज ठाकरे जाणार का? उद्धव ठाकरे येणार का? त्या सगळा मराठीद्वेष्टांना सांगतो, तुम्ही आमच्या मराठीला हात लावून दाखवा. तुमचा हात जागेवर ठेवणार नाही', असा इशारा उद्धव ठाकरे यांनी दिला.आमचं कुणाशी भांडण नाही. आतापर्यंत किती मारामाऱ्या झाल्या. आमच्या अंगावर येऊ नका. शिवसेनाप्रमुखांनी आम्हाला शिकवलं आहे, एकतर कुणाच्या अंगावर जायचं नाही आणि कुणी अंगावर हात उचलला तर तो हात जागेवर ठेवायचा नाही. तीच शिकवण घेऊन आम्ही पुढे चाललो आहोत. आम्हाला कुणाचं उणंदुणं काढायचं नाहीय. पण विशेषत: मी दोन महत्त्वाच्या गोष्टी तुम्हाला सांगितल्या. एक म्हणजे हिंदुत्वावरुन आमच्यावर येऊ नका. तुमच्या सगळ्या टोप्या घातलेल्या फोटोंचे प्रदर्शन लावल्याशिवाय मी राहणार नाही', असं उद्धव ठाकरे म्हणाले.आम्हाला प्रश्न विचारण्याआधी तुमच्या नेत्यांना प्रश्न विचारा. बटेंगे तो कटेंगे करायचं की राखी कधी बांधायचं. महाराष्ट्रात गोमाता आणि बाजूला नेवून खाता हे तुमचं हिंदुत्व आहे. तुम्ही संशयावरुन माणसं मानतात. गोमांस खातात संशयावरुन तुम्ही माणसं मारतात आणि इकडे गोमांस जावून खायचं ही कोणती पद्धत आहे. ईशान्य भारतात त्यांच्या प्रवक्त्यांनी सांगितलं की, त्यांच्या राज्यात गोमांस खातात. मग ह्यांना पक्षात कसं ठेवलं? मी भाजपला प्रेमाने सांगतो. संधीचं सोनं करा. जो चिखल केलाय तो करु नका. अशी संधी नेहमी मिळत नाही', असं उद्धव ठाकरे भाजप नेत्यांना उद्देशून म्हणाले.

# अमित शहांनी दसऱ्याला काढलं ओबीसी कार्ड; विश्वासू नेत्यावर 'वैभव' टिकवण्याची जबाबदारी..

**अहमदाबाद :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहांचे विश्वासू मानले जाणारे जगदीश विश्वकर्मा गुजरात भाजपचे नवे प्रदेशाध्यक्ष असतील. शुक्रवारी दसऱ्याच्या मुहूर्तावर त्यांनी उमेदवारी अर्ज भरला. अहमदाबादच्या निकोल मतदारसंघाचे आमदार असलेले विश्वकर्मा ओबीसी समुदायातून येतात. त्यांनी गांधीनगरमधील प्रदेश कार्यालय 'कमलम'मध्ये विजयादशमीच्या मुहूर्तावर अर्ज दाखल केला. केवळ विश्वकर्मा यांनीच अर्ज भरल्यानं तेच पुढील प्रदेशाध्यक्ष असतील.केंद्रीय नेतृत्त्वानं नियुक्त केलेले पर्यवेक्षक केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव आणि के. लक्ष्मण यांच्याकडून विश्वकर्मा यांच्या नावाची औपचारिक घोषणा करण्यात येईल. गुजरातमध्ये आतापर्यंत प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी चंद्रकांत पाटील (सीआर पाटील) यांच्याकडे आहे. आता ते पायउतार होतील आणि विश्वकर्मा जबाबदारी स्वीकारतील. विश्वकर्मा सध्या भूपेंद्र पटेल यांच्या मंत्रिमंडळात सहकार मंत्री आहेत. आता विश्वकर्मा यांच्याकडे प्रदेशाध्यक्षपद येत असल्यानं भूपेंद्र पटेल यांच्या मंत्रिमंडळात बदल पाहायला मिळतील. पटेल यांच्या मंत्रिमंडळातील १७ पैकी १२ जणांना हटवण्यात येणार असल्याची चर्चा काही दिवसांपासून सुरु आहे.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी भाजपनं जगदीश विश्वकर्मा यांच्याकडे प्रदेशाध्यक्ष पद ओबीसी कार्ड बाहेर काढलं आहे. काँग्रेसचे विद्यमान प्रदेशाध्यक्ष अमित चावडा ओबीसी समाजामधूनच येतात. गुजरातमधील ५० टक्क्यांहून अधिक आमदार ओबीसी आहेत. जगदीश विश्वकर्मा ठाक्करबापनगरचे बूथ प्रभारी म्हणून राजकारणाची सुरुवात केली. अहमदाबाद शहर भाजप अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केलं आहे. २०१२ मध्ये ते अहमदाबाद शहर मतदारसंघातून आमदार झाले. यानंतर २०१७ आणि २०२२ मध्ये त्यांनी आमदारकी राखली. सध्या पटेल यांच्या मंत्रिमंडळात असलेल्या विश्वकर्मा यांच्याच नेतृत्वात भाजप २०२७ मध्ये होणारी विधानसभा निवडणूक लढेल. २०२२ मध्ये भाजपनं १८२ पैकी १५६ जागा जिंकत इतिहास रचला.



# ओवैसींच्या सभेआधीच अहिल्यानगरचं राजकारण तापलं

**अहिल्यानगर :** अहिल्यानगरमध्ये एआयएमआयएमचे खासदार असदुद्दीन ओवेसी यांच्या सभेचा मुद्दा गाजत आहे. आगामी महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर या सभेला राजकीय महत्व प्राप्त झाले आहे. यातच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे आमदार संग्राम जगताप यांनी मात्र ओवैसींवर जोरदार टीका केली आहे.

जगताप ओवैसींवर निशाणा साधत म्हणाले की, एमआयएमची पतंग किती उंच न्यायची आणि कुठे कापायची हे महाराष्ट्रातील प्रत्येकाला ठाऊक आहे. पतंग फक्त हिंदूंच्या संक्रांतीलाच उडते, इतर वेळी ती कुणालाच मान्य नसते. त्यामुळे पतंगीच्या जीवावर जर कोणी मांजा-चक्री खेळत असेल, तर त्याचा बंदोबस्त हिंदू समाज करू शकतो, असा इशारा त्यांनी दिला.वक्फ बोर्डाच्या कामकाजावरही जगतापांनी सवाल उपस्थित केले. वक्फ बोर्डाद्वारे केवळ एका विशिष्ट समाजालाच न्याय दिला जातो. फाळणीच्या वेळी



भारतात बाहेरून आलेल्या इतर समाजांवर अन्याय होता कामा नये.

त्याकाळी फक्त एका वर्गासाठी कायदा तयार करण्यात आला. आमची मागणी आहे की, फाळणीनंतर भारतात आलेल्या सर्व समाजांसाठी स्वतंत्र कायदा करावा. लवकरच याबाबत आम्ही सरकारकडे मागणी करणार आहोत, असे जगताप म्हणाले.ओवेसींची सभा, नगरच्या महापालिकेच्या रणधुमाळीचा रंग आणि त्यावरून पेटलेला राजकीय वाद यामुळे नगरचे राजकारण तापले आहे.

# काका सदानंद कदमांचा कट्टर समर्थक फोडला, कोकणात उलटफेर

**रत्नागिरी :** जिल्ह्यात दापोली मतदारसंघात आता आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पडघम वाजू लागले आहेत. याच पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस : शरदचंद्र पवार पक्षांना दणका देत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेने जोरदार तयारी केली आहे. त्याचाच पहिला टप्पा म्हणून आज दोन मोठे पक्षप्रवेश होत आहेत.दोन वेळा पंचायत समिती सदस्य राहिलेल्या योगिता बांद्रे, तसेच शिवसेनेच्या रामदास कदम यांचे ठाकरे गटातील बंधू, उद्योगपती सदाआप्पा कदम यांचे कट्टर समर्थक प्रकाश सकपाळ यांचा आज शिवसेना पक्षप्रवेश करून घेत गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी मोठी खेळी केली आहे.कोकणातील दापोली खेड मतदारसंघात शिवसेना नेते रामदास कदम आणि त्यांचे बंधू असलेले सदानंद कदम यांच्यातील राजकीय वैमनस्य हे सर्वज्ञात आहे. आता उद्योगपती सदानंद कदम यांचेच एकेकाळी असलेले समर्थक आणि कार्यकर्तेही आता रामदास कदम यांचे सुपुत्र योगेश कदम यांना साथ देण्यासाठी शिवसेनेत दाखल झाले आहेत.यापूर्वी अमरीश हेदुकर हे शिवसेनेत दाखल झाले, आता अमरीश हेदुकर यांच्यानंतर सदानंद कदम यांचे दुसरे सहकारी राहिलेले प्रकाश सपकाळ हेही आज शिवसेना प्रवेश करणार आहेत. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य



संस्थांच्या निवडणुकीत ठाकरे गटाला नामोहरम करण्याची राजकीय रणनीती आखल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.

ठाकरे गटाचे नेते अनिल परब यांनी दापोली नगरपंचायत निवडणुकीत मोठी खेळी करत रामदास कदम यांना शह देण्याचा यशस्वी प्रयत्न केला होता. मात्र त्यानंतर राज्यात मोठा राजकीय भूकंप झाला, सत्ता परिवर्तन झालं आणि याच सत्ता परिवर्तनाच्या पटावर ठाकरे यांचे समर्थक असलेले नगरसेवकही शिवसेनेत दाखल झाले.गेल्या दापोली नगरपंचायत निवडणुकीत ठाकरे गटाचे नेते असलेले अनिल परब व उद्योगपती सदानंद कदम यांना साथ देणारे कार्यकर्ते व त्यावेळी निवडून आलेले नगरसेवक हे यापूर्वीच शिवसेनेत दाखल झाले आहेत. यापूर्वीच ठाकरे गटाचे असलेले माजी आमदार संजयराव कदम शिवसेनेत आले आहेत. एकेकाळी विधानसभा निवडणूक लढवलेले माजी पंचायत समिती सभापती किशोर देसाई हे सुद्धा यापूर्वीच शिवसेनेत रामदास कदम यांच्याबरोबर आले आहेत.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



### घरासमोरच दोघांकडून वार, रुग्णालयात नेलं पण..

# कुटुंबाच्या डोळ्यादेखत तरुणाने प्राण सोडले

**जळगाव :** जळगाव शहरातील कासमवाडी परिसरात जुन्या वादातून एका तरुणावर दोघांनी धारदार तलवार आणि कोयत्याने वार करून त्याची निर्घुण हत्या केली आहे. ही धक्कादायक घटना शुक्रवारी ३ ऑक्टोबर रोजी रात्री उशिरा साडे बारा वाजेच्या सुमारास घडल्याची माहिती आहे. ज्ञानेश्वर उर्फ नाना भिका पाटील (वय-२७ रा. कासमवाडी) असे मयत तरुणाचे नाव असल्याची माहिती आहे. या प्रकरणी आता स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवघ्या काही तासातच संशयित आरोपीला बेड्या ठोकल्या आहे.जळगाव शहरातील कासमवाडी परिसरात राहणाऱ्या ज्ञानेश्वर उर्फ नाना भीकन पाटील याचा घरासमोरील काही तरुणांसोबत जुना वाद सुरु होता. शुक्रवारी ३ ऑक्टोबर रोजी रात्री १२.३० वाजता कासमवाडी येथील एकता मित्र मंडळ येथे उभा असताना त्याच्या घरासमोर दोन जणांनी जुन्या वादातून त्याच्या पोटावर



तसेच पायाच्या मांडीवर तलवार आणि कोयत्याने वार केले. यात ज्ञानेश्वर उर्फ नाना हा गंभीर जखमी झाला.या घटनेत नाना उर्फ ज्ञानेश्वर हा गंभीर जखमी झाल्याने त्याला त्याच्या नातेवाईकांनी तातडीने खाजगी वाहनातून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. यावेळी वैद्यकीय अधिकारी यांनी तपासणीनंतर मृत घोषित केले. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर विभागीय पोलीस अधिकारी नितीन गणपुरे एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बबन आव्हाड आणि पीएसआय चंद्रकांत धनके यांच्यासह पोलिसांनी रुग्णालयात धाव घेतली. यावेळी नातेवाईकांनी प्रचंड आक्रोश केल्याचे पाहायला मिळाले.या खुनाच्या गुन्ह्यातील मुख्य आरोपी नामे योगेश संतोष पाटील उर्फ पिंटू (वय २७, रा. कासमवाडी, जळगाव) याला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवघ्या काही तासांत नशिराबाद परिसरातून शिताफीने अटक केली. आरोपीला पुढील कारवाईसाठी एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे. या प्रकरणाचा तात्काळ तपास करून आरोपीला अटक करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक डॉ. श्री महेश्वर रेड्डी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड यांना दिले.

## एसटी ड्रायव्हरने बसमध्येच आयुष्य संपवलं

**अहिल्यानगर :** तारकपूर बसस्थानकात काल गुरुवारी सकाळी एक धक्कादायक घटना घडली. सुरेश चंद्रभान धामोरे (वय ५४, रा.सारोळा कासार, ता. अहिल्यानगर) या एसटी बसचालकानं स्वतःच्या ताब्यातील बसमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली. धामोरे यांच्याविरोधात १ ऑक्टोबर बुधवारी रोजी कर्तव्यावर असताना मद्यप्राशन केल्याप्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. त्यानंतर दुसऱ्यायाच दिवशी त्यांनी टोकाचं पाऊल उचललं. मद्यप्राशन केल्याचा संशय स्थानकातील कर्मचाऱ्याना आला. ही माहिती आगारप्रमुख अविनाश कोल्हापुरे यांना देण्यात आली. त्यानंतर वरिष्ठांच्या आदेशानुसार फिर्यादी शिवाजी मारुती खजिनदार यांनी त्यांना तोफखाना पोलिस ठाण्यात नेलं. मद्यप्राशन केलं असल्याचं निष्पन्न झालं.

## निळ्या ड्रममध्ये बुडवलं, हात-पाय बांधले अन..मी तिला संपवलंचा मेसेज

**भोपाळ :** मध्य प्रदेशातील देवास जिल्ह्यातून एक खळबळजनक हत्याकांड समोर आलं आहे. येथे एका तरुणाने आपल्या प्रेयसीला पाण्याने भरलेल्या ड्रममध्ये बुडवून तिची हत्या केली. त्यानंतर तिचा मृतदेह हातपाय बांधून एका खोलीत ठेवला आणि पळून गेला. ही घटना वैशाली अव्हेन्यू कॉलनीमध्ये घडल्याची माहिती आहे.

ही घटना मध्य प्रदेशातील देवास जिल्ह्यातील वैशाली एव्हेन्यू परिसरात घडली. लक्षिता चौधरी नावाच्या एका तरुणीचा मृतदेह भाड्याच्या घरात सापडला आणि एकच खळबळ माजली. तिच्या कुटुंबातील सदस्यांच्या मते, ही तरुणी तीन दिवसांपासून बेपत्ता होती.या तरुणाने प्रेयसी लक्षिताची हत्या केली, तिचे हात-पाय बांधले आणि पळून जाण्यापूर्वी तिचा मृतदेह खोलीत सोडला. त्याने मुलीला पाण्याने भरलेल्या निळ्या ड्रममध्ये बुडवल्याचा आरोप आहे.याप्रकरणी मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, लक्षिता २९ सप्टेंबरपासून वैशाली एव्हेन्यू कॉलनीतील घरातून कॉलेजला जात असल्याचं सांगून निघाली होती. पण, परत आली नाही. कुटुंबाने



पोलिसांकडे ती बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली.

तपासात असं समोर आलं की, महिलेची मोनू उर्फ मनोज चौहान नावाच्या मुलाशी मैत्री होती. कुटुंबातील सदस्यांनी विचारणा केली असता, आरोपीने त्यांना कुठेतरी जात असल्याचे सांगत दिशाभूल केली. त्यानंतर, १ ऑक्टोबर रोजी, त्याने मुलीच्या कुटुंबाला संदेश पाठवला की त्याने तिची हत्या केली आहे आणि तिचा मृतदेह त्याच्या खोलीत आहे.पोलिसांनी तात्काळ वैशाली एव्हेन्यूवरील त्याचं घर गाठलं आणि पाण्याच्या ड्रमजवळ तिचा मृतदेह बेडशीटने झाकलेला आढळून आला. लक्षिताने गरब्याचा पोशाख घातला होता. तिचा मृतदेह कुजल्यामुळे खूपच वाईट स्थितीत होता. आरोपी मोनू चौहानने सिटी कोतवालीला जाऊन पोलिसांना शरण गेला.

## दसऱ्याला नाशिकमध्ये तरुणाला संपवल


**नाशिक :** नाशिक शहरात पुन्हा एका तरुणाची हत्या झाल्यानं नाशिक जिल्हा हादरला आहे. शहरात जानेवारी ते सप्टेंबर या नऊ महिन्यात ४२ हत्या झाल्या आहेत तर ऑक्टोबरच्या पहिल्या दोन दिवसातच ४३वी हत्या झाली आहे.

नाशिक शहरात हत्येचं सत्र सुरू असून काल दसऱ्याच्या रात्री कृष्णा ठाकरे या तरुणावर कोयता आणि धारदार शस्त्राने वार करण्यात आल्यानं त्याचा मृत्यू झाला.नाशिक रोड भागातील गुरेवाडी या ठिकाणी नवरात्राच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच दसऱ्याच्या रात्री दांडिया खेळत असताना किरकोळ वादातून एका टोळक्याने कृष्णा ठाकरे या युवकावर कोयता आणि धारदार शस्त्राने हल्ला केला. या हल्ल्यात कृष्णा गंभीर जखमी झाला होता, त्याला उपचाराकरिता रुग्णालयात दाखल केलं असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केलं. घटनेची माहिती मिळताच पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले आणि संशयित आरोपी मोईन शेख, चिराग उर्फ मोगिनी बारसे, यश बारसे आणि प्रकाश उर्फ आशू बारसे यांना ताब्यात घेतलं. कृष्णा ठाकरे याची हत्या का करण्यात आली? याचं कारण समजू शकलेलं नाहीय.

## काय रे, रिक्वेस्ट का स्वीकारली नाहीस ? म्हणत केली मारहाण

**पुणे :** सोशल मीडियामुळे जग जवळ आले हे सत्य असले तरी याच सोशल मीडियामुळे अनेक विपरीत घटना समाजामध्ये घडताना पाहायला मिळत आहेत. एकीकडे सोशल मीडिया हे संवादाचे उत्तम माध्यम बनत असताना दुसरीकडे याचा वापर गुन्हेगारीसाठी सुद्धा होतो. त्यामुळेच सायबर फ्रॉड सारख्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. इतकच नाही तर आता थेट इंस्टाग्रामवरील फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारली नाही म्हणून एका तरुणावर टोळक्याने हल्ला केल्याची धक्कादायक घटना पुणे जिल्ह्यात घडली आहे. पुण्यातील वाढत्या गुन्हेगारीने चिंता वाढवली आहे.

इंस्टाग्रामवरील फ्रेंड रिक्वेस्टला प्रतिसाद न दिल्याचा राग मनात ठेवून एका तरुणावर चार जणांनी हल्ला केल्याची घटना शिरूर तालुक्यात घडली आहे. डोंगरगण चौफुला परिसरातील हॉटेल स्वरा येथे हा धक्कादायक प्रकार घडला असून, या प्रकरणी पोलिसांनी चार आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला आहे.या प्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रोहन मळीभाऊ खामकर (वय २१, रा. शिनगरवाडी, ता. शिरूर) हा मंगळवारी (३० सप्टेंबर ) दुपारच्या



सुमारास हॉटेल स्वरामध्ये फॅब्रीकेशनचे काम करीत होता. याच दरम्यान काही दिवसांपूर्वी इंस्टाग्रामवर पाठविलेली फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारली नाही, याचा राग धरून अमर मुंजाळ (रा. डोंगरगण), हर्षद खाडे, करण चव्हाण (दोघेही रा. म्हसे बुद्रुक) आणि सचिन पवार या चौघांनी त्याच्यावर हल्ला केला.या सर्वांनी लाकडी दांडक्यांनी, लाथा-बुक्क्यांनी तसेच हाताने रोहनच्या डोक्यावर, चेहऱ्यावर आणि हातावर मारहाण केली. या घटनेत तो गंभीर जखमी झाला असून, त्याने शिरूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. रोहनच्या तक्रारीनंतर चौघांविरोधात गुन्हा दाखल केला असून, पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. या घटनेने पुण्यात मात्र एकच खळबळ उडाली आहे. अशा क्षुल्लक कारणावरुन एखाद्यावर जीवघेणा हल्ला होणे हे अत्यंत चिंताजनक आहे.

# दसऱ्याला अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

**रायगड :** गेल्या काही दिवसापूर्वी रायगड जिल्ह्यात एका परप्रांतीय इसम पंकज यादव (उत्तर प्रदेशातील) याने १६ वर्षीय महाविद्यालयीन विद्यार्थिनी हिला तिच्या कुटुंबातील सदस्य यांना जीवे ठार मारण्याची धमकी देत १५ दिवस सतत जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केला. ही घटना ताजी असतानाच महाड तालुक्यात कामानिमित्त पुणे जिल्ह्यातून आलेल्या कुटुंबातील एका १० वर्षीय चिमुरडीवर जबरदस्ती करत लैंगिक अत्याचार केल्याची संतापजनक आता घटना समोर आली आहे. याबाबत महाड एम.आय. डी.सी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक जीवन माने यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

या घटनेबाबत मिळालेल्या माहितीनुसार, पुणे जिल्ह्यातून एक कुटुंब कामानिमित महाड तालुक्यात आलं होतं. १० वर्षीय अल्पवयीन पीडित मुलगी ही तिच्या कुटुंबासमवेत राहत होती. पीडितेची आई महाड तालुक्यातील एका बौद्धवाडी येथे मजुरीचं काम करत होती. तर पीडित अल्पवयीन मुलगी हिचे वडील कामानिमित पुणे जिल्ह्यातील मूळ गावी गेले होते. पीडित मुलगी ही



घरी एकटी होती. त्यावेळी आरोपी सचिन पांडुरंग सुतार (वय ३७, व्यवसाय - सुतारकाम, रा. कुंभारकोंड, वरंध, ता. महाड, जि. रायगड) या नराधमानं विजयादशमीच्या दिवशी पाणी पिण्याच्या बहाण्याने पीडितेला त्याच्या घरी नेलं. त्याने तिच्या हातातील चावी हिसकावून घर उघडलं. आरोपी सचिन पांडुरंग सुतार याने काल गुरुवारी रोजी दुपारी १२.०० ते १२.३० वाजण्याच्या सुमारास पीडितेच्या छातीला हात लावून तिच्यावर लैंगिक छेडछाड केली, तिला जमिनीवर पाडून छातीवर बसून जबरदस्ती केली.'ही गोष्ट कुणाला सांगितली, तर गळा दाबून ठार मारीन', अशी धमकी दिली. आरोपी सचिन सुतार याला माहिती असूनही की पीडिता अल्पवयीन आहे. त्याने तिच्याशी लैंगिक संबंध साधण्याचा प्रयत्न केला. याबाबतची माहिती अल्पवयीन पीडित मुलीनं घाबरलेल्या अवस्थेत आईला कामावरून आल्यानंतर सांगितली.

याबाबत आईने महाड एम.आय.डी.सी पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३३२(ख), ३३२(क), ३५१(३) सह बालकांना लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२चे कलम ४, ६, ७, १० अन्वये आज शुक्रवारी रोजी पहाटे साडे तीन वाजण्याच्या सुमारास गुन्हा दाखल केला आहे. सदर घटना घडल्यानंतर आरोपी सचिन सुतार हा फरार झाला होता. महाड एम.आय. डी.सी पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक जीवन माने यांनी गुन्हा दाखल झाल्यानंतर एक तासाच्या आता आरोपीला त्याच्या घराच्या पाठीमागील बाजूस असणाऱ्याया झाडीतून ताब्यात घेतलं आहे.

## प्रियकरासोबत सुनांचे दागिने घेऊन पळाली

**झांसी :** एक ४० वर्षाची महिला आपल्यापेक्षा ७ वर्षांनी लहान असलेल्या प्रियकरासोबत पळून गेली आहे. महिलेला दोन मुलं आणि सुना आहेत. तिला नातवंड आहेत. नातवंड खेळवण्याच्या वयात तिला दुसऱ्या पुरुषावर प्रेम झालं आणि ती त्याच्यासोबत पळून गेली. पळून जाताना घराच्या तिजोरीतील ४० हजार आणि सुनांचे दागिने घेऊन गेली. यामुळे घरच्यांना आणखी मोठा धक्का बसला आहे.संबंधित महिलेचं दोन वर्षांपासून पर पुरुषासोबत प्रेम प्रकरण सुरु होतं. पण तरीही ती सुधारेल. ती त्याच्यासोबतचं नातं तोडेल. घरातील नातवंडांमध्ये जीव गुंतवेल, अशी आशा तिच्या पतीला होती. पतीला तिच्या नात्याबाबत कल्पना होती. तिला समजवण्याचा प्रयत्न करायचा. पण तिने ऐकलं नाही.

## भारतीय फलंदाजांनी वेस्ट इंडिजच्या गोलंदाजांना फोडला घाम..

# एकाच दिवसात 3 शतकं, धावा 400 च्या पार

**मुंबई : भारत विरुद्ध वेस्ट इंडिज यांच्यात दोन सामन्यांची टेस्ट सीरिज खेळवली जात आहे. २ ऑक्टोबर पासून या सीरिजमधील पहिला सामना अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळवला जातोय. सामन्याच्या पहिल्या दिवशी टीम इंडियाने फलंदाजीत वेस्ट इंडिजला १६२ धावांवर रोखलं होतं. दुसऱ्या दिवशी टीम इंडियाच्या खेळाडूंनी जबरदस्त फलंदाजी करून शतकीय कामगिरी केली. यात सुरुवातीला केएल राहुल (घङ ठरहींश्र), ध्रुव जुरेल आणि मग रवींद्र जडेजाने शतक ठोकलं. त्यामुळे टीम इंडियाची धावसंख्या ४०० पार पोहोचली.**



### पहिला दिवस कसा होता?

■ भारत विरुद्ध वेस्ट इंडिज पहिल्या सामन्याचा टॉस वेस्ट इंडिजचा कर्णधार असलेल्या रोस्टन चेजने जिंकला आणि त्याने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे टीम इंडिया आधी गोलंदाजी करण्यासाठी मैदानात आली. पहिल्या दिवशी टीम इंडियाने वेस्ट इंडिजला १६२ धावांवर रोखलं. यात टीम इंडियाकडून सर्वाधिक ४ विकेट मोहम्मद सिराजने घेतल्या. तर जसप्रीत बुमराहने ३, कुलदीप यादवने २ तर वॉशिंग्टन सुंदरने १ विकेट घेतली. ४४.१ ओव्हरमध्ये वेस्ट इंडीजची पहिली इनिंग संपली. वेस्ट इंडिजकडून जस्टिन ग्रीव्हने सर्वाधिक ३२ धावा केल्या. फलंदाज शे होपने २६, रोस्टन चेसने २४, ब्रँडन किंगने १३, ॲलिक अथानाझेने १२, खॅरी पियरेने ११ धावा केल्या. पहिल्या दिवसाच्या अंती टीम इंडियाने फलंदाजी करताना २ विकेटवर १२१ धावा केल्या.

### भारताची प्लेईंग ११

■ यशस्वी जैस्वाल, केएल राहुल, साई सुदर्शन, शुभमन गिल (कर्णधार), ध्रुव जुरेल, रवींद्र जडेजा, वॉशिंग्टन सुंदर, नितीश कुमार रेड्डी, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज

### वेस्ट इंडिजची प्लेईंग ११

■ टँगेनारिन चंदरपॉल, जॉन कॅम्पबेल, अलिक अथानाझे, ब्रँडन किंग, शाई होप (विकेटकीपर), रोस्टन चेस (कर्णधार), जस्टिन ग्रीव्हस, जोमेल वॅरिकन, खारी पियरे, जोहान लेन, जेडेन सील्स

### दुसऱ्या दिवशी धावसंख्या ४०० च्याही पार

■ दुसऱ्या दिवशी टीम इंडियाकडून फलंदाजी करताना केएल राहुलने १०० धावा करून शतक ठोकलं. यादरम्यान त्याने १२ चौकार ठोकले. हे राहुलचं १० शतक होतं. शुभमन गिलने ५० धावा केल्या. टीम इंडियाचं दिवसातील दुसरं शतक ध्रुव जुरेलने ठोकलं, त्याने १२५ धावा केल्या यादरम्यान १५ चौकार आणि ३ षटकार ठोकले. दिवसाअंती उपकर्णधार रवींद्र जडेजाच्या बॅटमधून टीम इंडियासाठीचं तिसरं शतक आलं. त्याने नाबाद १०४ धावा केल्या यादरम्यान त्याने ६ चौकार आणि ५ षटकार ठोकले. जडेजाने ठोकलेलं हे टेस्ट क्रिकेटमधील ५ शतक होतं. दिवसाच्या अंती टीम इंडियाने ५ विकेट गमावून ४४८ धावा केल्या. तर वेस्ट इंडिज विरुद्ध २८६ धावांची आघाडी घेतली आहे.

# भारताच्या मीराबाई चानूने रौप्यपदक जिंकत इतिहास रचला

**मुंबई :** स्टार वेटलिफ्टर मीराबाई चानूने पुन्हा एकदा हिंदुस्थानची मान अभिमानाने उंचावली आहे. नॉर्वेतील फोर्डे येथे सुरू असलेल्या जागतिक वेटलिफ्टिंग चॅम्पियनशिपमध्ये (World Weightlifting Championships 2025) ४८ किलो वजनी गटात मीराबाईने रौप्य पदकावर मोहोर उमटवली आहे. या पदकासह म ीराबाई चानू हिंदुस्थानसाठी जागतिक चॅम्पियनशिपमध्ये सर्वाधिक पदके जिंकणारी तिसरी वेटलिफ्टर ठरली आहे. यापूर्वी म ीराबाईने २०१७ साली सुवर्णपदक आणि २०२२ साली रौप्यपदक जिंकले आहे.



ऑलिम्पिक विजेत्या मीराबाई चानूने जागतिक चम्पियनशिपमध्ये आपली विजयी घोडदौड कायम ठेवली आहे. २०१७ आणि २०२२ नंतर तिन्हे पुन्हा एकदा पदक पटकावत इतिहास रचला आहे. मीराबाईने ४८ किलो वजनी गटात स्नॅचमध्ये ८४ किलो आणि क्लीन अँड जर्कमध्ये ११५ असे एकूण १९९ किलो वजन उचलत रौप्य पदक पटकावले. चीनच्या थान्याथनला मीराबाईने अवघ्या १ किलोच्या फरकाने पिछाडीवर टाकले. त्यामुळे थान्याथनला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले. तर उत्तर कोरियाच्या री सांग गुमने २१३ किलो वजन उचलून सुवर्णपदक पटकावले.

# पॅरा ॲथलिटच्या हिम्मतीची हैराण करणारी कथा..!

**मुंबई** : खेळ विश्वातील अनेक कहाण्या या प्रेरणा देऊन जातात. अशीच एक घटना सध्या सुरु असलेल्या पॅरा ॲथलिट २०२५ मध्ये घडली. २०२५ न्यू वर्ल्ड पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये पोलंडची पॅरा ॲथलिट रोझा ही सकाळी हॉस्पिटल बेडवर होती, तर संध्याकाळी तिने स्पर्धेत सहभागी होऊन गोल्ड मेडल जिंकून सर्वांना आश्चर्यचकित केलं. पॅरा ॲथलिट २०२५ ही (झरीर ओंहिश्रशींळली २०२५) स्पर्धा आतापर्यंत भारतात आयोजित करण्यात आलेली सर्वात मोठी पॅरा स्पर्धा आहे. ज्यात तब्बल १०४ देशांच्या २२०० हून अधिक ॲथलिटने सहभाग घेतला आहे.

**सकाळी हॉस्पिटलमध्ये अनब संध्याकाळी गोल्ड मेडल**

**हॉस्पिटलमध्ये दाखल झाल्याच्या काही तासांनी मैदानात पुनरागमन..**

३० सप्टेंबरच्या सकाळी पोलंडची पॅरा ॲथलिट रोझा (ठेूर घेूर्ज़ीझर) ही अचानक हीट स्ट्रोक आणि डिहाइड्रेशनचा त्रास झाल्यामुळे बेशुद्ध पडली होती. उलट्या आणि शरीरात ट्रेन नसल्याने तिला दिल्लीच्या सफदरजंग हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आलं. डॉक्टरांनी तिला स्पष्ट शब्दात सांगितलं की तिला आराम करायची गरज आहे. खेळात भाग घेणं तिच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकतं. पण रोजाने हिम्मत दाखवली आणि डॉक्टरांना सांगितलं की, 'मी फक्त इथं उपस्थिती लावण्यासाठी नाही तर खेळण्यासाठी आलीये'. त्यानंतर तिने हट्ट केला आणि हॉस्पिटलम धून डिस्चार्ज घेऊन सरळ स्टेडियमवर पोहोचली.



**गोल्ड मेडलच नाही रेकॉर्ड सुद्धा केला..**

२०२५ न्यू वर्ल्ड पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये महिलेने एफ-३२ क्लब थ्रो इवेंटमध्ये भाग घेतला. तिचं शरीर खूप कमजोर होतं. पण तिची हिम्मत कायम होती. तिनं २९.३० मीटर थ्रो केला, तिच्या थ्रोने चॅम्पियनशिपमध्ये एक नवा रेकॉर्ड प्रस्थापित केला आणि या थ्रोमुळेच रोझाने सुवर्णपदक मिळवून दिले. सामन्यानंतर रोझा भावुक झाली. तिने सांगितलं की, 'हे पदक भारतीय डॉक्टर आणि त्यांच्या टीमला समर्पित करते, जर त्यांनी माझी काळजी घेतली नसती आणि पाठिंबा दिला नसता तर मी मैदानावर परतू शकले नसते'.

**संघर्षाने भरलेलं जीवन**

रोझा कोझाकोव्स्का हिला लहानपणीपासून ब्लड डिसऑर्डर होता, ज्यासाठी तिची कीमोथेरेपी झाली होती. यानंतर लाइम रोगामुळे, तिला क्वाड्रिप्लेजिक झाले, म्हणजेच तिच्या चारही अंगांमध्ये पक्षाघातासारखी लक्षणे दिसू लागली. तरीही तिने जिद्द कायम ठेवली आणि २०१९ च्या वर्ल्ड चॅम्पियनशिप स्पर्धेत आणि २०२० च्या टोकियो पॅरालिंपिकमध्ये पदकं जिंकली. रोझा कोझाकोव्स्का ही जगातील सर्वोत्तम पॅरा-ॲथलीट्सपैकी एक आहे.

रोझा कोझाकोव्स्का ही पोलंडची एक प्रमुख पॅरा-ॲथलीट आहे. तिच्या बालपणीपासून ब्लड डिसऑर्डर होता, ज्यामुळे तिला कीमोथेरेपी घ्यावी लागली. नंतर लाइम रोगामुळे तिला क्वाड्रिप्लेजिक (चारही अंगांमध्ये पक्षाघातासारखी लक्षणे) झाली. तरीही तिने हार मानली नाही आणि २०१९ च्या वर्ल्ड चॅम्पियनशिप आणि २०२० च्या टोकियो पॅरालिंपिकमध्ये पदक जिंकली. ती जगातील सर्वोत्तम पॅरा-ॲथलीट्सपैकी एक आहे.

**२०२५ न्यू वर्ल्ड पॅरा ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप ही स्पर्धा कशी आणि कुठे आयोजित झाली?**

ही स्पर्धा भारतात आयोजित झाली, जी आतापर्यंत भारतातील सर्वात मोठी पॅरा स्पर्धा आहे. यात १०४ देशांतील २२०० हून अधिक ॲथलीट्सनी सहभाग घेतला. स्पर्धा ३० सप्टेंबर २०२५ रोजी सुरू झाली, आणि दिल्लीत स्टेडियमम ध्ये झाली.

**रोझाने गोल्ड मेडल कोणाला समर्पित केलं?**

स्पर्धेनंतर रोझा भावुक झाली आणि तिने हे पदक भारतीय डॉक्टर आणि त्यांच्या टीमला समर्पित केलं. तिने सांगितलं, 'जर त्यांनी माझी काळजी घेतली नसती आणि पाठिंबा दिला नसता, तर मी मैदानावर परतू शकले नसते.'

## राज्य कबड्डी संघटनेची निवडणूक चार महिन्यांत घ्या

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनची निवडणूक चार महिन्यांत घेण्याचे आदेश उच्च न्यायालयाने निवडणूक अधिकारी यांना दिले आहेत. तसेच न्यायालयाने निवृत्त न्या. पृथ्वीराज चव्हाण यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली आहे.

गेल्या वर्षी असोसिएशनची निवडणूक जाहीर झाली. ही निवडणूक राष्ट्रीय क्रीडा संहितेनुसार व्हावी, अशी मागणी करत सातारा जिल्हा हौशी कबड्डी असोसिएशनने ॲड. वैभव गायकवाड व रफिक सय्यद यांच्या मार्फत याचिका दाखल केली. न्या. महेश सोनक व न्या. अद्वैत सेठना यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली. न्यायालयाने सविस्तर सुनावणी घेऊन राष्ट्रीय क्रीडा संहितेनुसारच निवडणूक घेण्याची सक्त ताकीद दिली.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सुशांत सिंह प्रकरणात रियाला मिळाला न्याय



**बॉलिवूड अभिनेत्री रिया चक्रवर्तीला अखेर पाच वर्षांनंतर तिचा भारतीय पासपोर्ट परत मिळाला असून हा तिच्यासाठी मोठा दिलासा मानला जात आहे. बॉलिवूड अभिनेता सुशांत सिंह राजपूतच्या निधनानंतर ड्रग प्रकरणात रिया चक्रवर्तीचे नाव समोर आले होते आणि २०२० मध्ये नारकोटिक्स कंट्रोल ब्युरोने तिचा पासपोर्ट जप्त केला होता. अलीकडेच बॉम्बे हायकोर्टाने पासपोर्ट परत देण्याचा आदेश दिला आणि त्यानंतर रिया चक्रवर्तीला तिचे अधिकृत कागदपत्र परत मिळाले.**

## सुशांत प्रकरणाची पार्श्वभूमी

- ८ सप्टेंबर २०२० रोजी छउइ ने रिया चक्रवर्तीला तिचा भाऊ आणि इतर काही लोकांसह अटक केली होती. तिच्यावर सुशांत सिंहसाठी ड्रगजची खरेदी व सोय करून देण्याचा आरोप ठेवण्यात आला होता. हा खटला सुशांत सिंहच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीनंतर सुरू झाला होता. ज्यामुळे बॉलिवूडमधील ड्रग्जच्या वापरावर व्यापक तपास झाला.
- ऑक्टोबर २०२० मध्ये बॉम्बे हायकोर्टाने रिया चक्रवर्तीला जामीन दिला होता. मात्र त्यावेळी तिच्या जामिनाच्या अटींनुसार पासपोर्ट छउइ कडे ठेवणे बंधनकारक होते. यामुळे गेल्या पाच वर्षांत तिला परदेश प्रवासासाठी प्रत्येक-वेळी ट्रायल कोर्टाची परवानगी घ्यावी लागत होती. आता पासपोर्ट परत मिळाल्याने रियाला नव्याने काम आणि वैयक्तिक आयुष्य पुढे नेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



## इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करत रियाने दिली माहिती..

**रिया चक्रवर्तीला पासपोर्ट कधी परत मिळाला?**

**रिया चक्रवर्तीला ३० सप्टेंबर २०२५ रोजी बॉम्बे हायकोर्टाच्या आदेशानुसार तिचा भारतीय पासपोर्ट परत मिळाला. हा निर्णय सुशांत सिंह राजपूत प्रकरणातील ड्रग केसमधील अटकानंतर ५ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर आला.**



रिया चक्रवर्तीला पासपोर्ट मिळाल्यानंतर रियाने तिच्या इन्स्टाग्रामवर एक फोटो शेअर केला. ज्यामध्ये तिने लिहिले आहे की, 'गेल्या पाच वर्षांत माझं खरा पासपोर्ट म्हणजे फक्त धैर्य होतं. अनगिनत लढाया, अंतहीन आशा आज पुन्हा एकदा मी माझ्या हातात पासपोर्ट घेत आहे. आता मी माझ्या आयुष्याच्या नव्या अध्यायासाठी तयार आहे! सत्यमेव जयते असं तिने शेअर केलेल्या इन्स्टाग्राम पोस्टमध्ये म्हटलं आहे. तर अनेक सेलिब्रिटीज व चाहत्यांनी तिच्या या पोस्टवर सकारात्मक प्रतिक्रिया दिल्या असून त्यासोबत काही जणांनी तिला शुभेच्छा दिल्या आहेत.

सोशल मीडियावर रिया चक्रवर्तीचा मोठा चाहता वर्ग आहे. अभिनेत्रीला पासपोर्ट परत मिळाल्यामुळे आता तिचे चाहते देखील खूश झाले आहेत. त्यांनी देखील तिचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

### बॉम्बे हायकोर्टाने काय आदेश दिला?

- बॉम्बे हायकोर्टाने नारकोटिक्स कंट्रोल ब्युरोला रियाचा पासपोर्ट ताबडतोब परत देण्याचे आदेश दिले. कोर्टाने सांगितले की, जामिनाच्या अटींनुसार पासपोर्ट जप्त होता, पण आता तिच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक गरजांसाठी तो परत देणे आवश्यक आहे.

### का जप्त झाला पासपोर्ट?

- ८ सप्टेंबर २०२० रोजी नारकोटिक्स कंट्रोल ब्युरोने रिया चक्रवर्तीला अटक करताना पासपोर्ट जप्त केला. सुशांत सिंह राजपूतच्या वडिलांच्या तक्रारीनंतर सुरू झालेल्या ड्रग केसमध्ये तिच्यावर ड्रग्जची खरेदी आणि पुरवठा करण्याचे आरोप होते.

# गौतमी पाटीलच्या गाडीचा अपघात

## रिक्षाचालकासह ३ जण गंभीर





**मुंबई :** प्रसिद्ध नृत्यांगणा गौतमी पाटील हिच्या गाडीचा भीषण पुणे मुंबई बंगळुरु राष्ट्रीय महामार्गावरील वडगाव पुलाजवळ हा अपघात झाला. गौतमीच्या चालकाने मंगळवारी पहाटे ५ च्या सुमारास एका रिक्षाला जोरदार धडक दिली असून ३ जण जखमी झाले आहेत. त्यांना तत्काळ जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलीस या घटनेचा अधिक तपास करत आहेत.

गौतमी पाटीलच्या चालकाकडून हा अपघात घडला आहे. अपघाताचे काही फोटो समोर आले आहेत. गौतमीच्या गाडीच्या ज्यावेळी अपघात झाला त्यावेळी ती गाडीत नव्हती. मात्र तिच्या चालकाकडून हा अपघात घडला आहे. पुणे येथील पुणे मुंबई बंगळुरु राष्ट्रीय महामार्गावरील वडगाव पुलाजवळ हा अपघाच घडला आहे. यावेळी एका हॉटेलसमोर उभ्या असलेल्या रिक्षाला चालकाने मागून धडक दिली त्यात रिक्षाचालकासह दोन प्रवासी होते. ही धडक इतकी जबरदस्त होती की, यामध्ये रिक्षाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तर रिक्षाचालकासह दोन प्रवासीही गंभीर जखमी झाले आहेत.

अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यावेळी गाडीचालक तिथेच असल्याने पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले.

# १५ वर्षांनंतर मुंबईत खरेदी केलं घर, उघड केला संघर्षाचा प्रवास



**मुंबई :** मुंबईत स्वत:च्या नावाचं घर असावं, हे प्रत्येकाचं स्वप्न असतं. मात्र, या महानगरीतील गगनाला भिडलेल्या किमती पाहता अनेकांच्या आयुष्यात हे स्वप्न अपूर्णच राहतं. पण मराठी अभिनेत्री मीरा जोशी हिने आपल्या चिकाटीने आणि जिद्दीने अखेर हे स्वप्न साकार करून दाखवलं आहे. दसऱ्याच्या शुभमुहुर्तावर मीराने मुंबईतील स्वत:च्या घरात गृहप्रवेश केला. याची आनंदवार्ता तिने सोशल मीडियावर चाहत्यांसोबत शेअर केली. 'मुंबईत माझं स्वत:चं घर असावं, हे मी गेली १५ वर्षं उराशी बाळगून होते. अखेर ते स्वप्न पूर्ण झालं. आज मी अत्यंत समाधानी आणि कृतज्ञ आहे,' असं ती भावूक होत म्हणाली.

१५ वर्षांपूर्वी मीरा मुंबईत आली. या शहराने तिला आपलंसं केलं आणि अभिनयाची संधीही दिली. मात्र, घर घेण्याच्या स्वप्नासाठी ती सतत झगडत राहिली. 'इतकी वर्षं मी भाड्याच्या घरात राहिले. घरमालकांनी कधी अडचण दिली नाही. पण स्वत:चं असं एक घर असावं, ही भावना नेहमीच मनात होती,' ती सांगते.

मीरा पुढे म्हणाली, 'माझ्या आईने नेहमीच माझ्यावर विश्वास ठेवला. स्वत:च्या अर्टीवर, मूल्यांशी तडजोड न करता काम करण्याची प्रेरणा दिली. माझे बाबा, दादा, मित्र दुर्गेश, मामा, पूनम मामी आणि माझ्यावर प्रेम करणारे प्रेक्षक या सगळ्यांचा मी आभारी आहे. त्यांच्या प्रेमामुळे आणि पाठिंब्यामुळेच मी आज इथपर्यंत पोहोचले आहे.'

२०२५ हे वर्ष तिच्यासाठी खास ठरलं आहे. 'या वर्षी मी माझं प्रॉडक्शन हाऊस 'कृष्णसखी' सुरू केलं आणि त्याच वर्षी स्वत:चं घरही घेतलं. हे वर्ष धाडसाचं आणि स्वप्नांना योग्य दिशा देणारं आहे,' असं ती म्हणाली.

# अनुकंपा उमेदवारांना शनिवारी नियुक्तीपत्रे वाटप होणार !...

## जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यक्रमाचे आयोजन एमपीएससीच्या ५० उमेदवारांनाही नियुक्तीपत्रे मिळणार...

जनसंचलन/बुलढाणा

मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या महत्वाकांक्षी १५० दिवस कृती कार्यक्रमांतर्गत शनिवारी ४ ऑक्टोबर रोजी अनुकंपा आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या उमेदवारांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात सकाळी ११ वाजता होणार आहे. या कार्यक्रमात १८४ अनुकंपा उमेदवारांना आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची शिफारस प्राप्त ५० उमेदवारांना नियुक्तीपत्रे देण्यात येणार आहे. यात अनुकंपा गट क व ड प्रवर्गातील १८४ उमेदवारांमध्ये राज्य शासनाच्या विभागासाठी ३६, जिल्हा परिषदेच्या ग्रामविकास विभागासाठी ८२, नगरपरिषदेसाठी ५७, पोलीस विभागासाठी ९ उमेदवारांना नियुक्ती पत्रे देण्यात येणार आहे. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या गट क सेवा मुख्य परीक्षाअंतर्गत ५० उमेदवारांना नियुक्तीपत्रे प्रदान केले जाणार आहे. या कार्यक्रमाला पालकमंत्री, सहपालकमंत्री, लोकप्रतिनिधी, जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

## लोकशाही दिन ६ ऑक्टोबरला

जनसंचलन/बुलडाणा

दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. त्यानुसार ऑक्टोबर महिन्याचा लोकशाही दिन सोमवार, दि. ६ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात घेण्यात येणार आहे. लोकशाही दिनासाठी तक्रारदारांनी उपस्थित राहावे, उपस्थित राहणे शक्य नसल्यास तक्रारी रजिस्टर पोस्टाने लोकशाही दिनाआधी जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचतील अशाप्रकारे पाठवावेत, असे आवाहन प्र. निवासी उपजिल्हाधिकारी सदाशिव शेलार यांनी केले आहे.

## आणीबाणीत कारावास भोगलेल्यांनी मानधनासाठी अर्ज करण्याचे आवाहन


जनसंचलन/बुलढाणा

देशात २५ जून १९७५ ते ३१ मार्च १९७७ या कालावधीत आणीबाणी लागू करण्यात आली होती. या काळात सामाजिक व राजनैतिक कारणांसाठी लढा देतांना कारावास भोगलेल्या व्यक्तींचा सन्मान करण्यासाठी शासनाने मानधन योजना कार्यान्वित केली असून या मानधनासाठी २४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज सादर करण्याची मुदत देण्यात आली आहे. त्यानुसार आणीबाणीच्या काळात कारावास भोगलेले पात्र लाभार्थी किंवा त्यांचे हयात पश्चात जोडीदार (पती/पत्नी) ज्यांनी अद्याप अर्ज केलेला नाही, त्यांनीच विहित नमुन्यातील अर्ज व शपथपत्रासह जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा येथे २४ नोव्हेंबर २०२५ पूर्वी अर्ज सादर करणे आवश्यक आहे.निश्चित केलेल्या तारखेनंतर कोणत्याही परिस्थितीत अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## महात्मा गांधी जयंतीनिमित्त जिल्हा कारागृहात गांधी शांती परीक्षा

जनसंचलन/बुलढाणा

महात्मा गांधी जयंतीनिमित्त बुलडाणा जिल्हा कारागृह वर्ग-२ येथे बंद्यांमध्ये गांधी विचारांची रुजवणूक करून त्यांना जबाबदार नागरिक बनविण्याच्या उद्देशाने गांधी शांती परीक्षेचे आयोजन करण्यात आले. या परीक्षेचे आयोजन मुंबई सर्वोदय मंडळ, मुंबई तसेच बुलडाणा जिल्हा सर्वोदय मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. या परीक्षेमध्ये एकूण ४३ बंद्यांनी सहभाग घेतला. परीक्षेत प्राविण्य मिळविणाऱ्या बंद्यांना बक्षिसे व प्रमाणपत्र देण्यात आले, तर इतर सहभागी बंद्यांना प्रोत्साहनपर प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा सर्वोदय मंडळाच्या अध्यक्षा लता ओंकार राजपुत उपस्थित होत्या. यावेळी सर्वोदय मंडळ कार्यकर्ते रमेश वानखेडे व नभिजितसिंह ओंकारसिंह राजपुत यांनी मार्गदर्शन केले. या प्रसंगी कारागृह अधीक्षक मेघा कदम-बाहेकर, तुरुंगाधिकारी उमेश नाईक, सुभेदार दरेसिंग चव्हाण तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कारागृह शिपाई वैभव राणे, दिनेश डोंगरदिवे, उमेश बोंद्रे, जितेश काळवाघे, चंद्रकांत महाले व अश्विनी भालके यांचे विशेष सहकार्य लाभले.



## सायबर फसवणूक झाल्यास विनाविलंब तक्रार द्या - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## सायबर फसवणूक तक्रारीसाठी गोल्डन अवर महत्वाचा...


जनसंचलन/मुंबई

रस्ता अपघातामध्ये ज्या पद्धतीने गोल्डन अवरमध्ये उपचार मिळाल्यास अपघातग्रस्तांचे प्राण वाचू शकतात. त्याच पद्धतीने सायबर फसवणुकीमध्येही गोल्डन अवर महत्वाचा आहे. जेवढी विनाविलंब तक्रार द्याल, तेवढी फसवणूक झालेली रक्कम वाचविणे आणि परत मिळविणे सोयीचे होते. त्यामुळे सायबर फसवणूक झाल्याचे समजल्यास तातडीने विनाविलंब १९३० किंवा १९४५ या हेल्पलाईन क्रमांकावर तक्रार द्यावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. सायबर जनजागृतीप माह ऑक्टोबर २०२५ कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते महाराष्ट्र पोलीस मुख्यालय येथे झाले. यावेळी पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इक्बाल सिंह चहल, अभिनेता अक्षय कुमार, अभिनेत्री राणी मुखर्जी, व्हीजेटीआयचे डॉ. फारूक काझी, ङ्मआयआयटीफ मुंबईचे प्रा. मंजेश हनवाल यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, आजच्या डिजिटल युगात सायबर गुन्हे टाळणे हेच सर्वात मोठ आव्हान आहे. गुन्हा घडल्यानंतर गुन्हेगाराला शिक्षा होण्याबरोबरच आर्थिक तोटा टाळणे आवश्यक आहे. सायबर फसवणूक टाळण्यासाठी जनजागृती हा सर्वात प्रभावी उपाय आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे फिशिंग, ओटीपी फसवणूक, डीपफेक, आवाज व चेहरा क्लोनिंग अशा नवीन तंत्रांचा गैरवापर करून सामान्य लोकांना फसवले जात आहे. सोशल मीडिया, ऑनलाईन व्यवहार, पेमेंट्स यामध्ये आपण माहिती देतो. कुकीज स्वीकारल्यानंतर वैयक्तिक माहितीचा गैरवापर होऊ शकतो. यावरून घोटाळे, खंडणी, सायबर बुलिंग यासारखे प्रकार घडतात. राज्यात जागतिक स्तराची सायबर सिक्युरिटी लॅब, प्रतिसाद केंद्रे आणि रेग्युलेटरी यंत्रणा उभारण्यात आल्या आहेत. यामुळे फसवणुकीनंतर तत्काळ कारवाई करून नुकसान कमी करता येते. मात्र यासाठी वेळेवर तक्रार होणे महत्वाचे आहे. आधुनिक तंत्रज्ञानच धोका असून त्यावर तंत्रज्ञान हाच उपाय आहे. डीपफेकसारख्या आव्हानांवर आपली क्षमता वाढविणे गरजेचे आहे. कोणताही डिजिटल गुन्हा त्याचा डिजिटल फिंगरप्रिंट मागे ठेवतो. त्यामुळे क्षमता आणि जनजागृती दोन्ही समान महत्वाचे आहेत. युवकांपर्यंत सायबर सुरक्षिततेबाबत माहिती पोहोचवणे आवश्यक असून, या कार्यात कम्युनिकेटर्सची महत्वाची भूमिका आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले. पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला म्हणाल्या की, नागरिकांना सजग ठेवण्यासाठी आणि त्यांचे त्वरित संरक्षण करण्यासाठी रेल्वे मंत्रालयाने उल्लेखनीय जनजागृती मोहीम सुरू केली आहे. देशातील प्रत्येक मोठ्या रेल्वे स्थानकावर दररोज सायबर सुरक्षा सूचना दिल्या जात आहेत. लाखो नागरिक हे संदेश दररोज त्यांच्या दैनंदिन जीवनात ऐकत आहेत. राज्य पोलीस यंत्रणाही जनजागृतीची गरज ओळखून महाराष्ट्रातील सर्व शहरांमध्ये, जिल्ह्यांमध्ये आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर सखोल जनजागृती मोहीम राबवत आहे

# मराठवाडा-विदर्भात अतिवृष्टीचा कहर; असं नुकसान शेतकऱ्यांनी कधीच पाहिलं नाही, शरद पवारांची सरकारकडे मदतीची मागणी

जनसंचलन/ बुलढाणा

बारामती : मराठवाडा आणि विदर्भ भागात गेल्या काही दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसाने शेतकऱ्यांचे अक्षरशः कंबरडे मोडले आहे. काही ठिकाणी पिके पाण्याखाली गेली, तर काही भागात वाहून गेली आहेत. या परिस्थितीबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरदचंद्र पवार गट) अध्यक्ष शरद पवार यांनी तीव्र चिंता व्यक्त केली आहे. बारामती येथे माध्यमांशी बोलताना पवार यांनी राज्य सरकारच्या धोरणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत सरकारने त्वरित मदतीचा निर्णय घ्यावा, अशी मागणी केली.या नुकसानीबाबत सरकार काय धोरण जाहीर करते, हे पाहणे महत्त्वाचे आहे. अशा प्रकारचे शेतकऱ्यांचे नुकसान यापूर्वी कधीही झाले नव्हते. त्यामुळे शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई मिळणे गरजेचे आहे, असे शरद पवार यांनी सांगितले. अतिवृष्टीमुळे सर्वच पिकांचे प्रचंड नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने खासदार सुप्रिया सुळे यांनी देखील केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चव्हाण यांची भेट घेऊन शेतकऱ्यांना अतिरिक्त मदत आणि विशेष निधी मंजूर करण्याची मागणी केली असल्याची माहिती पवार यांनी दिली दरम्यान, मराठवाडा व विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये मागील काही दिवसांपासून पावसाची स्थिती गंभीर होती. मात्र, शेतकऱ्यांच्या हातात रोख मदत आणि नुकसानभरपाई





पोहोचल्याशिवाय त्यांना दिलासा मिळणे अशक्य आहे. शरद पवार यांच्या या विधानामुळे राज्य सरकारवर दबाव वाढण्याची शक्यता आहे. आता राज्य सरकार या आपत्तीवर कितपत तत्परतेने कार्यवाही करते आणि शेतकऱ्यांना योग्य मदत देते, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष्य लागले आहे. मराठवाडा आणि राज्यातील इतर भागातील नुकसानाची अचूक माहिती अद्याप राज्य प्रशासनाकडे उपलब्ध नाही. परंतु असे मानले जाते की यावर्षी १४४ लाख हेक्टर बियाणे केलेल्या जमिनींपैकी सुमारे ७० लाख हेक्टरवरील पीक अतिवृष्टी आणि पुरामुळे प्रभावित झाले आहे. याचा अर्थ राज्यातील कृषी क्षेत्राचा ५० टक्के हिस्सा या खरीप हंगामात खराब झाला आहे. या संकटाचे परिणाम आधीच दिसू लागले आहेत.

# न्याय निवाडा धनादेशाचा अनादर!

## आरोपीस ३ महिने सश्रम कारावासाची शिक्षा अन् दहा लाख रुपयांचा दंड!

जनसंचलन/बुलढाणा



एका धनादेश अनादर प्रकरणात आरोपीस ३ महिने सश्रम कारावासाची शिक्षा अन् दहा लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. बुलढाणा येथील रहिवासी व फिर्यादी मीना मनोज अग्रवाल यांच्या मालकीची मौजे. पोहरा पूर्णानगर ता. भातुकली, जि. अमरावती येथील गट क्र.४७ मध्ये 0 हे ८१ आर क्षेत्रफळाची वडीलोपार्जीत शेतजमीन होती. त्यांनी सदर शेतजमीन विक्रीचा व्यवहार आरोपी प्रशांत सुधाकरराव पाटील. रा. आसेगाव पूर्णा, ता. चांदूर बाजार, जि. अमरावती यांच्यासोबत केला होता. आरोपीने खरेदीचा मोबदला अंशतः रोख रक्कम देऊन व उर्वरित रक्कम धनादेशाद्वारे प्रदान करण्याचे कबुल केले होते. परंतु धनादेशाचा अनादर झाल्याने फिर्यादी यांनी बुलढाणा येथील न्यायालयात ॲड. अजय दिनोदे यांच्यामार्फत फिर्याद दाखल केली होती. सदर प्रकरणात न्यायालयाने लेखी फिर्याद, पुरावे व फिर्यादी तर्फे ॲडव्होकेट यांचा युक्तिवाद ग्राह्य पकडून आरोपीस दोषी धरले व ३ महिन्यांची सश्रम कारावासाची शिक्षा तथा रक्कम १० लाख रुपये दंड ठोठावून, दंडाची रक्कम फिर्यादीस देण्याचे आदेशित केले आहे. फिर्यादी तर्फे ॲड. अजय दिनोदे यांना ॲड. रोहित दिनोदे, ॲड. अबुजर अन्सारी व अॅड. प्रियेश चौधरी यांनी सहकार्य केले आहे

# मित्रांगण परिवार आयोजित काव्य-गझल

## मैफिलकोजागिरीच्या पूर्वसंध्येला बुलढाण्यात अक्षर अक्षर तुझेच आहे...

जनसंचलन/ बुलढाणा

मराठी गझलच्या मंदीरात छोटीशी पणती प्रज्वलित करण्याचा मित्रांगण परिवाराचा अल्पसा प्रयत्न बुलढाणेकर जाणून आहेत. याही वर्षी रसिकांना मित्रांगण परिवारासोबत मराठी गझलांची कोजागिरी साजरी करावयाची आहे. कोजागिरीच्या पूर्वसंध्येला मित्रांगण परिवाराकडून आयोजित महाराष्ट्रभर तुफान गाजलेला ङ्गअक्षर अक्षर तुझेच आहे..फ काव्य-गझल मैफिलीचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, ५ ऑक्टोबर २०२५ रोजी एडेड हायस्कूलच्या आतील प्रांगणात संध्याकाळी ७ वाजता आयोजित हा कार्यक्रम पूर्णपणे निःशुल्क असून सर्वच रसिकांनी या मैफिलीची आनंद घ्यावा, असे आवाहन मित्रांगण परिवाराच्या वतीने करण्यात आला आहे.मागील नऊ वर्षांपासून मित्रांगण परिवार मराठी गझलांची कोजागिरी साजरी करीत आहे. आतापर्यंत विविध दर्जे दार कार्यक्रमांची मेजवानी मित्रांगण परिवाराने बुलढाणेकरांना दिली आहे. यावर्षी अपूर्व, नैनेश, अविनाश, सारंग यांच्या मनवेधक सादरीकरणासह आणि राग यांच्या बहारदार संगीत संयोजनात सजलेली ङ्गअक्षर अक्षर तुझेच आहे..फ ही स्वरचित कवितांची बहार मैफल होत आहे. विशेष म्हणजे का कार्यक्रम निःशुल्क आहे. केशर दूधाचा आस्वाद घेत कोजागिरीच्या पूर्वसंध्येला आयोजित या काव्य-गझल मैफिलीच्या रसग्रहणासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे




आवाहन मित्रांगण परिवाराच्या वतीने चंद्रशेखर जोशी, नरेन राजपूत, आनंद संचेती, डॉ. राजेश्वर उबरहंडे, डॉ. आशिष खासबागे, कमलेश कोठारी, मनोज बुरड, रणजीतसिंग राजपूत, राहुल (विक्की) चव्हाण, रितेश खडके (जैन), अभिजीत निंबाळकरर, सुनिता प्रकाश जोशी आदिंनी केले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८